ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 1 | SEPTEMBER - 2017

HISTORICITY RESEARCH JOURNAL

मुधोजी भोसलेचा नवस व शहा दुल्हा रहमान गाझीचा मकबरा

डॉ. प्रशांत प्र. कोठे
इतिहास विभाग प्रमुख, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट, जि. अकोला .

प्रस्तावना :

मध्ययुगात वऱ्हाडात सर्वात महत्वाचे व प्रसिध्द शहर अचलपूर अथवा एलिचपूर होय. अचलपूरात सर्वात प्राचीन आणि प्रसिद्ध इमारत म्हणून शहादुल्हा रहमान गाझीचा मकबरा ओळखला जातो. तो बिच्चन नदीच्या काठावर आहे. येथे दर वर्षी १० रबी उल अव्वल ला मोठ्या प्रमाणात उर्स (यात्रा) भरत असतो. त्या उर्समध्ये वऱ्हाडातील हजारो हिंदू व मुसलमान लोक मोठ्या आनंदाने भाग घेत असतात.[१]

हा मकबरा अल्लाउद्दीन खिलजीने ज्यावेळी देवगिरीवर आक्रमण केले त्यावेळी परत जात असतांना तो अचलपूरला थांबला. त्यावेळी त्याने मकबरा बांधण्याचा आदेश आपल्या अधिकाऱ्यांना दिला. अल्लाउद्दीन खिलजीने प्रथम कबर बांधली[२] त्यानंतर दुरुस्ती होत होत हल्लीची कबर सफदरखा सेस्तातानी याने बहामनी बादशहा अल्लाउद्दीनेच्या आदेशाने हीजरी ७१२ मध्ये शहागाझी आणि त्याच्या आईच्या कबरेचा घुमट बांधला.[३] या मकबऱ्याला विटांच्या जाळ्या करुन सुशोभित केले आहे. या मजारमध्ये मोठ्या दरवाज्यातून आत गेल्यावर अनेक कबरी दिसून येतात. त्यात जुन्या महत्त्वाच्या व्यक्तींना दफन केले आहे असे सांगितले जाते. त्यात एका मजारवर, मोठ्या प्रमाणात नक्षीकाम दिसते. या मकबऱ्याला हैद्राबादच्या 'आसफजही (निजाम)' राज्यकर्त्यांनी सुद्धा दर्ग्याला आर्थिक मदत दिली[४] त्याचप्रमाणे एलिचपूरचे नबाबांनीही काही दुरुस्ती केली[५] या मकबऱ्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे मजारला बांधलेला परकोट होय. तो नागपूरकर मुधोजी भोसले यांनी बांधला.

मुस्लीम धार्मिक ठिकाणांना आणि इमारतींना हिंदूंचा हातभार लागला आहे. 'राजश्री सेनाधुरंधर (मुधोजी भोसले) यांची स्वारी आलजपुरास गेली. म्हणून विनंती सेवेशी लिहलीच आहे. तेथे जाऊन रहिमानशाबाबा यांचे दर्शन घेऊन सलाबतखान यांचे घरी जाऊन चार घटका बसले.....'[६]

वरील दृष्टीकोनातून नागपूरकर भोसल्यांनी बजावलेली कामगिरी अतिशय महत्त्वाची मानली जाते. एलिचपूरचे नबाब इस्मायलखान पन्ही व नागपूरचे मुधोजी भोसले यांचे मित्रत्त्वाचे संबंध होते आणि ते जगजाहीर सुद्धा होते. त्या निमित्ताने नागपूरकर मुधोजी भोसले अनेक वेळा एलिचपूरात येऊन नबाब इस्मायलखान पन्हीकडे राहत असत. भोसल्यांची शहा दुल्हा रहमान गाजीविषयी असलेली श्रद्धा, यातूनच मुधोजी भोसलेच्या मनात शहा दुल्हा रहमान गाजीविषयी पूज्य भावना होती व त्यांची त्यावर श्रद्धा होती. तो एलिचपूरला येत असतांना नेहमी शहा दुल्हा रहमान गाझीच्या दर्शनास जात होता. मुधोजी भोसले शहादुल्हा रहमानचा भक्त होता. त्याच्या दर्ग्यातून दर्शन घेऊन येत असतांनाच त्याच्यावर मारेकऱ्यांनी हल्ला केला होता. त्यात तो जखमी झाला होता.[७] या वेळी त्याला झालेल्या जखमा दुरुस्त होई पर्यंत तो नबाबाकडेच राहीला होता.

सेनासाहेब सुभा जानोजीच्या मृत्यूनंतर साबाजी व मुधोजीत सेनासाहेब सुभाच्या वाद वरुन संघर्ष निर्माण झाला. त्यावेळी मुधोजी इ.स. १७७४ मध्ये एलिचपूर येथे होता. त्याने एलिचपूरचा प्रसिद्ध मुसलमान संत शहा रहमान गाजी याच्या दर्ग्याला नवस केला की, 'माझ्या मुलाला (दुसरा रघुजी) सेनासाहेब सुभ्याची वस्त्रे मिळाली तर दर्ग्याच्या चार बाजूंनी प्रवेशद्वार बांधीन.' त्यानंतर मुधोजी आणि साबाजी यांच्यात पाचगांव येथे १७७५ मध्ये लढाईत झाली त्यात साबाजी मारला गेला त्यामुळे मुधोजीचा मार्ग निष्कंटक होऊन २४ जून १७७५ रोजी सेनासाहेब सुभ्याची वस्त्रे दुसऱ्या रघुजीस सवाई माधवराव पेशव्याकडून मिळाली. मुधोजीची इच्छा पुर्ण झाली म्हणून शहा रहमान गाजीच्या दर्ग्याला चार बाजूंनी चार प्रवेशद्वार इ.स. १७७५ ते १७७६ च्या दरम्यान बांधून त्यावर पाच शिलालेख कोरले आहेत.[८] हे पर्शियन भाषेतील शिलालेख भोसल्यांच्या धार्मिक सहिष्णूतेवर प्रकाश टाकतात. दर्ग्याच्या आत पश्चिम दरवाज्यामध्ये शिलालेख खोदला आहे. तो इ.स. १७७५–७६ चा आहे. या शिलालेखावरुन ही माहिती मिळते की शहादुल्हा रहमान गाजीला वऱ्हाडची शान म्हटल्या गेले आहे. या शिलालेखावरुन असे दिसते की मुधोजी भोसलेने दर्ग्याच्या आत दरवाजे बनविले ते गाविलगडचा राजपूत सरदार व किल्लेदार झामसिंगाच्या म्हणण्यावरुन इजउद्दीनच्या देखरेखीखाली बांधला गेला आहे.

असाच एक शिलालेख इ.स. १७७७–७८ मधील पूर्व दरवाज्यावर तो बनवल्याचा उल्लेख आहे व हा शिलालेख पर्शियन भाषेत असून कवी फरीयादचा उल्लेख आहे. उत्तर दरवाज्यावरील शिलालेखावरुन तो राजा मुधोजीने बनवल्याचा उल्लेख आहे. याच मजारच्या दक्षिण दरवाज्यावर राजा रघुजी भोसले दुसरा याने मीर मेहदीच्या म्हणण्यावरुन बांधला हा मीर मेहदी अचलपूरात इमारती बांधण्याचा दरोगाच्या (इमारते दरोगा) हुद्द्यावर होता.[८] यावरुन असे दिसून येते की अचलपूरच्या शहा दुल्हा रहमानच्या दर्ग्यात हिंदूंचाही सहभाग आहे.

मुधोजीने या दरवाजांचे बांधकाम चालू केले. त्यातील तीन दरवाज्यांचे बांधकाम 'शेख इजुउद्दीन' व झामसिंग याच्या देखरेखीखाली केल्या गेले आणि चौथा दरवाजा राजा रघुजी (दुसरा) याने मीर मेहदीकडून बांधून घेतला.[१०] याचा बुरुज व बारादरी दगडांच्या बांधल्या आहे. येथील दरवाज्यावर शिलालेख आहे. पहिला शिलालेख हा मकबऱ्याच्या पश्चिम दरवाज्यावर बाहेरच्या भागात आहे. त्याचा आकार ३६ सें.मी.लांब व ३० सें.मी उंच आकाराचा आहे[११] या शिलालेखावरील मजकुरात शहा रहमान गाझीला वऱ्हाडची शान म्हटल्या गेले आहे. तसेच तो झामसिंगाने हीजरी ११८९ (इ.स. १७७५–७६) मध्ये बांधला आहे[१२] असे म्हटले आहे. याच दरवाज्याच्या आतल्या बाजूने दुसरा शिलालेख असून तो हीजरी ११९० (इ.स. १७७६–७७) चा आहे. त्याचा आकार ३५ सें.मी. लांब ३५ सें.मी.उंच एवढा आहे.[१३] या शिलालेखात झामसिंगाचा सहकारी इजुउद्दीन याच्या देखरेखीखाली त्याचे बांधकाम झाल्याचे व बांधलेल्या सालाचा उल्लेख आहे.[१४] तीसरा शिलालेख पूर्व दरवाज्यावर असून तो ४५ सें.मी लांब ५० सें.मी. उंच आकाराचा आहे[१५] हा शिलालेख ११९१ हिजरी (इ.स. १७७७–७८) मध्ये बांधला असून त्याचे लिखाणात शहा रहमानला दळाळू म्हटले आहे.[१६] चौथा शिलालेख दक्षिण दरवाजावर आहे. तो ५० सें.मी. लांब ६८ सें.मी उंच आकाराचा आहे.[१७] त्यात म्हटले आहे की, मुधोजीची इच्छा पूर्ण झाली व झामसिंगचा सहकारी इज्जुदीनने हिजरी ११९२ (इ.स. १७७८–७९) मध्ये बांधला आहे.[१८] असे म्हटल्या गेले आहे. पाचवा शिलालेख हा उत्तर दरवाज्यावर आहे तो व्यवस्थित दिसत नाही. हा शिलालेख राजा रघुजीने 'मीर मेहदी' कडून हीजरी ११९५ (इ.स. १७८०–८१) मध्ये बांधून घेतला आहे.[१९] या मजारच्या देखभालीसाठी व नगारखान्याच्या खर्चासाठी नबाब इस्मायलखान पन्हीने कांडली गावची जहागिरी दिली होती[२०] याच मजार मध्ये गुलाम हूसेनखॉ या शेवटच्या नबाबाने एक मशिद बांधली आहे[२१] हा दर्गा मुस्लीमांना जेवढा पूज्य आहे तेवढाच हिंदूंनाही तो पूज्य आहे.

निष्कर्ष :–

१) दुल्हा रहमान शहा गाजीचा दर्गा वऱ्हाडची शान मानले जाते.
२) वऱ्हाडातील हजारो हिंदू व मुसलमान लोकांची या मजारवर श्रध्दा होती व आहे.
३) भोसल्यांची शहा दुल्हा रहमान गाजीविषयी श्रद्धा होती.
४) दुसरा रघुजीला सेनासाहेब सुभ्याची वस्त्रे मिळावी म्हणून मुधोजीने दर्ग्याला नवस केला.
५) मुधोजी आणि साबाजी यांच्यात पाचगांव येथे १७७५ मध्ये लढाईत झाली त्यात साबाजी मारला गेला त्यामुळे मुधोजीचा झालेला विजय हा शहा दुल्हा रहमान गाजी च्या आर्शिवादामुळे झाला, अशी त्याची समजूत होती.
६) शहा दुल्हा रहमान गाजी मुळेच मुधोजीची इच्छा पुर्ण झाली. अशी जनमाणसात समजूत झाल्याने जनमाणसांची शहा दुल्हा रहमान गाजीवर श्रध्दा निर्माण झाली.
७) म्हणूनच आजही शहा दुल्हा रहमान गाजीच्या उर्समध्ये वऱ्हाडातील हजारो हिंदू व मुसलमान लोक मोठ्या आनंदाने भाग घेत असतात.
८) हा दर्गा मुस्लीमांना जेवढा पूज्य आहे तेवढाच हिंदूंनाही तो पूज्य आहे.

संदर्भ ग्रंथ सूची

१) अमरावती मंडल ईद विशेषांक, १९९९, पृ. क्र. १४३.
२) काळे या. मा., वऱ्हाडचा इतिहास, पृ.क्र. ३०६.
३) महमद मेहताबखॉं, तजकेरा–ए–रहमानी, पृ. क्र. १९.
४) Quddusi M. Y., Nagpur Dates and Events, p. 15.
५) काळे या. मा., वऱ्हाडचा इतिहास, पृ.क्र. ३०६.
६) Sejwalkar T. S., Nagpur Affairs, Vol. II, Let. No. 121, p. 59.
७) तारीख–ए–बरार, पृ.क्र. ३५८.तारीखे अमजदीया.
८) Quddusi M. Y., Bhonsala of Nagpur and their Inscription from Ellichpur, p. 113-122. (सारांश)
Quddusi M. Y., Nagpur Dates and Events, p. 15-17. (सारांश)
९) रब्बानी, अचलपूर तारीख और तखाड्गत, पृ. क्र. ४५, ४६.
१०) Quddusi M. Y., Nagpur Dates and Events, p. 15.
११) शिलालेख मोजमाप केले त्यानुसार.

१२) Quddusi M. Y., Nagpur Dates and Events, p. 16.
१३) शिलालेख मोजमाप केले त्यानुसार.
१४) Inscription Listed in the Annual Report in Indian Epigraphy of ASI 910, p. 96.
१५) शिलालेख मोजमाप केले त्यानुसार.
१६) Quddusi M. Y., Nagpur Dates and Events, p. 17.
१७) शिलालेख मोजमाप केले त्यानुसार.
१८) Quddusi M. Y., Nagpur Dates and Events, p. 17.
१९) Quddusi M. Y., Nagpur Dates and Events, p. 17.
२०) खतीब सय्यद अमजेद हूसेन, चिरागे बरार, पृ.क्र. १२२.
२१) देशपांडे य. खु., एलिचपूर वऱ्हाडची जुनी राजधानी, पृ.क्र. ८९.
काळे या. मा., वऱ्हाडचा इतिहास, पृ.क्र. ३५५.